गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# एसटी आरक्षण द्या, सरकार जागे हो, फडणवीस सरकार हाय हाय

## जालन्यात धनगर समाजाचा विराट मोर्चा





**जालना । प्रतिनिधी -** अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी आज जालन्यात धनगर समाजाने विराट मोर्चा काढला. गांधी चमन चौकातून निघालेला मोर्चा अंबड चौफुलीपर्यंत गेला. हजारोंच्या संख्येने समाजबांधव सहभागी झाल्याने जालन्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले.

धनगर समाज पारंपरिकरित्या मेंढपाळ व पशुपालक असून, लोकसंख्या ९ टक्क्यांच्या आसपास आहे. शिक्षण, नोकऱ्या व सामाजिक न्यायाच्या संधींमध्ये मागे राहिल्याने आरक्षण ही समाजाची दीर्घकालीन मागणी आहे. १९६० पासूनच समाज आरक्षणासाठी प्रयत्नशील आहे., १९९० नंतर विशेष गती मिळाली, पण प्रत्यक्ष निर्णय झाला नाही., २०१४ व २०१९ च्या निवडणुकीत आश्वासने मिळाली, मात्र अंमलबजावणी शून्य राहिली. २०१८ मध्ये नेमलेल्या अभ्यास समितीच्या अहवालावरही ठोस कारवाई झालेली नाही.

दीपक बोऱ्हाडे यांनी जालन्यात आमरण उपोषण सुरू केले असून, त्याला समर्थन म्हणून आजचा मोर्चा काढण्यात आला. समाजाने एसटी प्रवर्गात आरक्षण मिळालेच पाहिजे या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य सरकारविरोधात तीव्र नाराजी व्यक्त झाली. आंदोलनकर्त्यांनी इशारा दिला की, सरकारने लवकर निर्णय घेतला नाही, तर आणखी मोठ्या प्रमाणावर राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. मोर्चा सुरळीत पार पाडण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल स्वतः मोर्चात सहभागी होऊन परिस्थितीवर लक्ष ठेवत होते. कोणतीही कायदा-सुव्यवस्था बिघडू न देता मोर्चा शांततेत पार पडला. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाचा राजकीय आणि सामाजिक दोन्ही पातळीवर मोठा परिणाम आहे. राज्यातील अनेक विधानसभा मतदारसंघांमध्ये धनगर मतदार निर्णायक ठरतात. त्यामुळे समाजाच्या नाराजीचा फटका थेट सत्ताधाऱ्यांना बसू शकतो. आरक्षण न मिळाल्यामुळे शिक्षण व नोकऱ्यांमध्ये मागे राहिलेल्या समाजात निराशा वाढत आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ राजकीय नाही, तर सामाजिक न्यायाचा आहे. आधीच मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण यांसारखे गुंतागुंतीचे प्रश्न प्रलंबित असताना धनगर समाजाचा मोर्चा सरकारवर अतिरिक्त दबाव टाकतो आहे. जालन्यातील विराट मोर्च्याने पुन्हा एकदा धनगर समाजाच्या आरक्षणाची मागणी राज्याच्या राजकीय अजेंड्यावर ठळकपणे आणली आहे. जर सरकारने यावर तातडीने ठोस निर्णय घेतला नाही, तर पुढील काळात हा प्रश्न अधिक तीव्र होऊन आगामी निवडणुकांवर थेट परिणाम घडवू शकतो.



धनगर आरक्षणादरम्यान पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल हे स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. कायदा व सुव्यवस्था बिघडू न देता मोर्चा शांततेत पार पडला.

# जिल्ह्यात यलो अलर्ट

## सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. २४ सप्टेंबर व २६ सप्टेंबर २०२५ ते दि. २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलका ते मध्यम स्वरुपाची पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी हलका ते मध्यम व दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/ दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत पान २ वर

# जालना जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाची पालकमंत्री पंकजा मुंढे यांनी केली पाहणी; तात्काळ पंचनाम्याचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पाऊस झाल्याने गोदावरी नदीला पूर आला आहे त्यामुळे नदीच्या काठावरील अनेक गावामध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यातील काही गावात देखील नदीचे पाणी घुसून नागरिक पाण्यामध्ये अडकले होते. काहींच्या घरात पाणी आले होते. त्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी आज जालना जिल्ह्यातील पुरग्रस्त गावांचा दौरा केला. यावेळी श्रीमती मुंडे यांनी परतूर तालूक्यातील गोळेगाव, घनसावंगी तालुक्यातील भेंडाळा, कुंभार पिंपळगाव, मच्छिंद्रनाथ चिंचोली आणि अंबड तालुक्यातील सुखापूरी, शहापूर या गावांना भेट देऊन येथील पूरग्रस्त भागाची पाहणी केली.

यावेळी श्रीमती मुंढे यांनी नागरिकांशी संवाद साधुन, त्यांना तात्काळ मदत करणार असल्याचे आश्वासित केले. पंचनामे करण्याचे काम सुरु आहे, परंतू शासनामार्फत पुरग्रस्त भागातील बाधीत नागरिक आणि शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शासन नागरिकाच्या पान २ वर



## नुकसानग्रस्त भागातील शेतीशिवाराची कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली पाहणी

# एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात अतिवृष्टीने शेतीचे नुकसान झाले आहे, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागातील शेती शिवाराची आज कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पाहणी केली. सोमठाणा, ता.बदनापूर, ढाकलगाव, ता. अंबड या गाव शिवारातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काळजी करू नका, शासन आपल्या सोबत आहे असा धीर दिला. एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही असे सांगतानाच तात्काळ पंचनामे करून शासनाला अहवाल सादर करा, असे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

जालना जिल्ह्यातील सोमठाणा, ता.बदनापूर व ढाकलगाव, ता. अंबड शिवारात आज सकाळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी थेट बांधावर जात शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी आमदार नारायण कुचे यांच्यासह पान २ वर



# घाणेवाडी जलाशयातून अवैध वाळू उपसा करतांना आढळल्यास गुन्हा दाखल होणार



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील घाणेवाडी जलाशयातून अवैध वाळू उपसा सुरू असल्याची तक्रार प्रशासनाकडे प्राप्त झाल्यानंतर आज जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अधिकाऱ्यांच्या पथकाने स्थळ पाहणी केली.

या पाहणीत जालना तहसीलदार श्रीमती छाया पवार, बदनापूर तहसीलदार श्री. हेमंत तायडे, मंडळ अधिकारी श्री. भार्डीकर, मंडवाचे तलाठी श्री. मापारी, जालना तालुक्याचे तलाठी श्री. चव्हाण, तसेच जालना शहर महानगरपालिकेचे नगर अभियंता राजेश बगळे व पाणीपुरवठा वितरक राजु मोरे उपस्थित होते. घाणेवाडी जलाशयात मोठ्या पान २ वर

# संपादकीय

## मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक

हिंदी चित्रपटसृष्टीतील मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम यांचा आज पाचवा स्मृतिदिन. पाच वर्षापूर्वी २५ सप्टेंबर २०२० रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी एस पी बालसुब्रमण्यम यांचे कोरोनाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने रसिकांनी हळहळ व्यक्त केली होती कारण एस पी बालसुब्रमण्यम हे रसिकांचे आवडते पार्श्वगायक होते. त्यांचे निधन रसिकांना चटका लावून जाणारे ठरले. एस पी बालसुब्रमण्यम यांचा जन्म ४ जून १९४६ रोजी आंध्रप्रदेश मधील नेल्लोर येथील मेहुआ या गावी झाला. त्यांचे पूर्ण नाव श्रीपती पंडितराध्युला बालसुब्रमण्यम असे होते. एस पी बालसुब्रमण्यम यांचे वडील हरिकथा गायक होते. आंध्रप्रदेश मधील हे पारंपरिक लोकसंगीत आहे त्यात कविता, कथा, गायन, नृत्य यासह सर्व प्रकारांचा समावेश असतो. एस पी बालसुब्रमण्यम यांचे वडील नाटकातही काम करत. एस पी यांना एक भाऊ व दोन बहिण आहेत. एस पी यांनी मोठे होऊन इंजिनिअर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती पण ती पूर्ण होऊ शकली नाही. एस पी बालसुब्रमण्यम यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती त्यामुळे त्यांनी गायनातच करिअर करायचे असे ठरवले आणि त्यांनी व्यावसायिक गायनास सुरुवात केली. १९६४ साली त्यांना गायनात पहिले पारितोषिक मिळाले. त्यानंतर त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. सुरुवातीला त्यांनी आपल्या मातृभाषेत म्हणजे तेलगू भाषेत गाणी गायला सुरुवात केली नंतर त्यांनी तमिळ, मल्याळम आणि कन्नड या दक्षिण भारतीय भाषेतही गाणी गायला सुरुवात केली. दक्षिणात्य भाषेत त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लगली. त्याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढू लागली. त्यांच्या मंजुळ आवाजाने रसिकांना वेड लावले. त्यांचा आवाज आणि त्यांनी गायलेली गाणी रसिकांना इतकी आवडली की रसिकांनी त्यांना दक्षिणेतील. मोहम्मद रफी अशी पदवी दिली. दक्षिणेकडून त्यांनी आपला मोर्चा हिंदी चित्रपट सृष्टीकडे वळवला. हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केल्यावर त्यांना एक दुजे के लिये या चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. आजही या चित्रपटातील त्यांनी गायलेली गाणी प्रेक्षकांच्या ओठावर आहेत. या चित्रपटात त्यांनी गायलेले हम बने तुम बने एक दुजे के लिये.... या गाण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. एस पिंच्या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे नाव देशभर झाले. एस पी बालसुब्रमण्यम यांनी गायलेल्या पहिल्याच चित्रपटातील गाणी गाजल्याने त्यांना अनेक चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. अनेक संगीतकार त्यांना आपल्याकडे गाणी गाण्यासाठी गळ घालू लागले. पुढे त्यांनी अनेक चित्रपटात गाणी गायली ती गाणी लोकप्रियही झाली. हिंदी चित्रपट सृष्टीत त्यांचे आता चांगले बस्तान बसले. पत्थर के फुल, बागी, हम आपके है कौन? साजन, रोजा या चित्रपटात त्यानी गायलेली गाणी खूप गाजली. सलमान खानचा पहिला चित्रपट असलेल्या मैने प्यार किया या चित्रपटात त्यांनी सलमानचा आवाज बनून गाणी गायली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. सलमान खानला सुपरस्टार करण्यात एस पी बालसुब्रमण्यम यांचा मोलाचा वाटा होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सलमान खानच्या अनेक गाण्यांना त्यांचाच आवाज होता. सलमान खान आणि एस पी हे जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू होते. १९९० च्या दशकात त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली. एस पी यांनी १६ भाषांमधून ४० हजारांहून अधिक गाणी गायली. ८ फेब्रुवारी १९८१ रोजी सकाळी ९ ते रात्री ९ अशा १२ तासात तब्बल २१ कन्नड गाणी रेकॉर्ड करून त्यांनी विश्वविक्रम केला जो गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदला गेला. एस पी यांनी जवळपास पाच दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या आवाजाची मोहिनीच अशी होती की जो त्यांचा आवाज ऐकेल तो त्यांच्या प्रेमात पडेल. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांना तब्बल अर्धा डझन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. शिवाय अनेक फिल्मफेअर, स्क्रीन पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवले. रसिकांचे आवडते आणि रसिकांच्या मनात आदराचे स्थान असलेल्या या गायकाचे कोरोनाने अचानक निधन झाल्याने रसिकांना मोठा धक्का बसला होता. मंजुळ आवाजाचे जेष्ठ पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जीएसटी कपातीचे स्वागतच; यामुळे खरोखरच महागाई कमी होईल का? शेतकरी, गरीब व सर्वसामान्यांना दिलासा मिळेल का?

सरकार अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत त्यात मुख्यत्वे करून जीएसटी कमी केल्याने अनेकांना लाभ अवश्य होईल यात दुमत नाही.परंतु जीएसटी सरकारनेच लावली होती आणि आता ती कमी केली म्हणजे काय केले? सर्वप्रथम जीएसटच्या माध्यमातून सरकारची तिजोरी भरली ही बाब ठीक आहे आणि आता जीएसट कमी केली म्हणजे महागाई कमी झाली किंवा सर्वसामान्यांचे जगणे सुसह्य झाले म्हणता येणार नाही. कारण जीएसटीचा संपूर्ण पैसा हा जनतेच्या खिशातून जात असतो. देशाच्या १४० कोटी जनतेला खरोखरच दिलासा द्यायचा असेल व जीवन सुसह्य करायचे असेल तर सर्वप्रथम केंद्र सरकारने व राज्य सरकारांनी महागाई कमी करने अत्यंत गरजेचे आहे.कारण देशात महागाई भस्मासुर दिवसेंदिवस वाढत आहे व यावर तोंडाला पाने पुसण्याचे काम अल्पसा पगार डीए (महागाई भत्ता) यामाध्यमातून वाढवून सरकारी कर्मचाऱ्यांकडुन सरकार आपली पाठ थोपटून घेते.याचा आयता फायदा राजकीय पुढाऱ्यांच्या पगारामध्ये व पेंशनमध्ये होतो.परंतु व्यापारीवर्ग व पुंजीपतीवर्ग महागाई वाढवून सरकारची नेहमीच दिशाभूल करीत असतो व याचा लाभ कर्मचाऱ्यांना न होता व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होत असतो. याचे प्रायश्चित्त देशातील सर्वसामान्य,गरीब, शेतकरी,मोलमजुर यांना महागाईच्या रूपात नेहमीच भोगावे लागते आणि याची झळ आरोग्य,शिक्षण व जीवनावश्यक वस्तूंवर पडून याचे प्रायश्चित्त संपूर्ण कुटुंबाला वेगवेगळ्या रूपात भोगावी लागते. देशातील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जर १ टक्क्याने वाढ झाली असेल तर त्याचा व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात फायदा घेऊन संपूर्ण भारतामध्ये सर्वच वस्तूंवर २० टक्क्यांनी वाढ करतात.याचे प्रायश्चित्त शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना भोगावे लागते. कारण सरकारी कर्मचाऱ्यांची डीए वाढ सुध्दा नाहीच्या बरोबरीने असते.परंतु शेतकऱ्यांना व सर्वसामान्यांना याचा काहीच लाभ होत नाही हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे सरकारने महागाई कमी करण्यावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे.एकतर देशातील ९५ टक्के मुठभर आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी देशाचे वाटोळे करून करोडो रुपयांची मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती डांबुन ठेवल्याने देशात महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी व शैक्षणिक समस्या इत्यादी अनेक समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे.तर दुसरीकडे देशातील भरमसाठ महागाई वाढल्याने याचे प्रायचिश्चित्त देशाची १४० कोटी जनतेला भोगावे लागते. त्यामुळे जीएसटीत कपात करून खुप काही मोठी कामगिरी केली असे म्हणता येणार नाही व जीएसटी बचत महोत्सव सुध्दा म्हणता येणार नाही. देशातील राजकीय पुढारी जोपर्यंत सर्वसामान्यांनप्रमाणे वागणार नाही आणि रहाणार नाही तोपर्यंत देशाचा पायाभूत विकास संभव नाही.त्यामुळे सरकारने सर्वप्रथम आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे, त्यांच्या संपत्तीवर टाच ठेवायला पाहिजे.तेव्हाच देश सुजलाम सुफलाम होईल.तेव्हाच खरा बचत महोत्सव म्हणावा लागेल व जनता सुध्दा त्याचे मनापासून स्वागत करेल.काही ठिकाणी सुधारणा होण्याची सुध्दा गरज आहे. कारण सरकारने सर्वप्रथम जीएसटी दर वाढविले आणि आता कमी केले यामुळे गरिब व सर्वसामान्यांना काय फायदा? यांचाही राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सरकारने जीएसटी दर जर संतुलित ठेवला असता तर आज महागाईवर आपोआप नियंत्रण ठेवता आले असते.त्यामुळे आता जीएसटीमध्ये कपात करून महागाई कमी होईल असे मला वाटत नाही.आता जीएसटी महोत्सव आणि अगोदर जीएसटी वसुल केली त्याला कोणता महोत्सव म्हणावे! असाही प्रश्न सर्वसामान्यांनपुढे उपस्थित होतो. त्यामुळे हा महोत्सव नसुन प्रथम जास्त वसुल करने व नंतर त्याच्यात कमी करून स्वतःची पाठ थोपटने असेच म्हणावे लागेल. माननीय प्रधानमंत्री म्हणतात की, मी स्वदेशी खरेदी करतो, मी स्वदेशी विकतो ही भावना प्रत्येक देशवासीयांच्या मनात रूजली पाहिजे,तरच विकासाला गती मिळेल.राज्य सरकारांनी आत्मनिर्भर भारतआणि स्वदेशी मोहिमांना पाठबळ द्यावे.या वक्तव्याचे मनापासून स्वागतच आणि असेच व्हायला सुध्दा पाहिजे.देशात स्वदेशीचा नारा हा १९४७ पासुनच होता. परंतु पुंजीपतीवर्गांनी, हायप्रोफाइलमध्ये रहाणारे व राजकीय पुढारी यांनीच स्वदेशीच्या नाऱ्याला तिलांजली दिली व महागड्या विदेशी वस्तू खरेदी करण्यास सुरुवात केली व यावर जास्तीत जास्त भर दिला याला काय म्हणावे!आता आपण २१ व्या शतकात वावरत आहोत स्वदेशीचा वापर आपण जेव्हा म्हणतो तेव्हा याची सुरुवात देशातील आजी-माजी संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांपासुनच व्हायला पाहिजे. कारण देशातील प्रत्येक पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी १४० कोटी जनतेला भाषणामध्ये ग्यान वाटत असतात. देशातील प्रत्येक राजकीय पुढाऱ्यांनी दर महिन्याला जाहीर करायला पाहिजे की मी आणि माझ्या परिवारातील सदस्यांनी व कुटुंबीयांनी या-या विदेशी वस्तूंचा त्याग केला व स्वदेशी वस्तूंचा वापर करायला सुरुवात केली आणि असे सांगायला विसरू नये की पुढे चालून कोणत्याही विदेशी वस्तूंचा वापर करणार नाही तेव्हाच स्वदेशी खरेदी-विक्रीला महत्व येईल व खऱ्या अर्थाने देशाची वाटचाल आत्मनिर्भर भारत होण्याच्या दिशेने वाटचाल करेल. कारण यामुळे देशातील स्वदेशीच्या वस्तूंना चालना मिळण्यास मोठी मदत होईल.आज देशातील शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारी, महागाई, महागडे शिक्षण,आरोग्य सुविधांच्या समस्या याला जबाबदार देशातील ९५ टक्के राजकीय पुढारीच आहे. आज देशातील १४० कोटी जनतेला कशाची आवश्यकता असेल तर फक्त आरोग्य व शिक्षण सुविधांची,सरकारला आरोग्याच्या दृष्टीकोनातून किंवा शिक्षणाच्या



दृष्टीकोनातून कोणत्याही नवीन योजना आणण्याची गरज नाही.सरकारने जर आरोग्य सुविधा आणि शिक्षण सुविधा मोफत जर केले तर देशाची १४० कोटी जनता सरकारचे व राजकीय पुढाऱ्यांचे आभारी राहील.परंतु तसे होत नाही.कारण देशात सर्वांत जास्त खाजगी दवाखाने व शैक्षणिक संस्था ह्या राजकीय पुढाऱ्यांच्या किंवा पुंजीपती लोकांच्या आहेत.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# महाराष्ट्रात निसर्गाचा महाप्रलय...

महाराष्ट्रावर महाप्रलयाचं संकट आलं आहे. नेहमीपेक्षा थोडा लवकरच सुरू झालेला पाऊस नवरात्रीतही आषाढासारखा कोसळतो आहे. अहिल्यानगरच्या दक्षिण भागापासून मराठवाड्याला कवेत घेत या पावसाने अर्ध्या विदर्भालाही अक्षरशः झोडपून काढलं आहे. सोलापूर आणि जळगाव जिल्ह्याचा काही भागही या पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. जेमतेम पर्जन्यमानाच्या या प्रदेशाला कोकणापेक्षा अधिक मुसळधार पाऊस सोसणं कठीण आहे. पावसाच्या दीर्घकाळ आणि काही ठिकाणी ढगफुटीसारख्या कोसळण्याने या भागातील जनजीवन पूर्ण उद्ध्वस्त झालं आहे. विशेषतः शेतीचं झालेलं नुकसान अपरिमित आहे. महाराष्ट्राला मे महिन्यापासून पावसाचे चातकापेक्षाही जास्त वेध लागतात. अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागते. टँकरने होणारा पाणीपुरवठाही अपुरा पडू लागतो. माणसांना स्वतःच्या गरजा आणि पाळीव जनावरांच्या पाण्याच्या गरजा कशा भागवायच्या असा प्रश्न सतावत असतो. त्यामुळे, एकदा पाऊस सुरू झाला, की निम्मा महाराष्ट्र सुटकेचा निःश्वास टाकत असतो. राज्याचा त्यापेक्षा अधिक भाग पावसाने धरणं भरावी, तळी-विहिरी भराव्यात एवढीच माफक अपेक्षा ठेवून असतो. यावर्षी अनेक ठिकाणी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच पाणी चांगलं भरलं. जलाशय तुडुंब झाल्याने ग्रामीण भागात समाधान पसरलं. लोक उत्साहात होते. पण, ऑगस्टच्या शेवटापासून पावसाने आणखी जोर धरला तेव्हाच निम्म्या महाराष्ट्राचे धाबे दणाणले. नंतरच्या पावसाने शेतीचं, फळबागांचं नुकसान सुरू केलं. मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात याच काळात ढगफुटीसदृश पाऊस झाला.

परतीचा पाऊस जाता जाता दोन-चार ठिकाणी तडाखा देत असतोच. तसा इतिहास आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीला झालेलं नुकसान तिथेच थांबेल, अशी अटकळ होती. पण, प्रत्यक्षात पावसाचा जोर आणखी वाढला. सप्टेंबरचा दुसरा पंधरवडा उलटूनही पावसाचा जोर कमी होत नाही, हे लक्षात आलं, तेव्हाच जाणकारांना या वर्षीच्या महाराष्ट्रावरच्या संकटाची चाहूल लागली. अहिल्यानगरच्या दक्षिण भागातल्या दुष्काळी पट्ट्यातही असा पाऊस झाला, की गावंच्या गावं पुराने वेढली गेली. चारचाकी




गाड्या वाहून जातील, एवढ्या वेगाने पाण्याचे प्रवाह ऐन गावांतून गावांतून वाहत होते. गेल्या दोन दिवसांत पावसाचा हाच जोर सर्वदूर पसरला आहे. महाराष्ट्राचे अनेक जिल्हे आणि त्यातील अनेक तालुके अक्षरशः पाण्यात बुडाले आहेत.

महाराष्ट्रात यापूर्वीही पूर आले, महापूर आले. पण, अनेक जिल्ह्यांत एकाचवेळी रबरी बोटी आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने ग्रामस्थांची, नागरिकांची सुटका करण्याची वेळ आली नव्हती. ती यावेळी आली आहे. या महाप्रलयाला 'महा' का म्हटलं, ते यावरून लक्षात येईल. या पावसाळ्यात हिमालयात अनेक ठिकाणी ढगफुटी झाल्या. पर्वताचे मोठे भाग ढासळले. गावंच्या गावं वाहून गेली. पंजाबातही ३० जणांचा बळी घेऊन पावसाने आपला रुद्रावतार दाखवला. पण, महाराष्ट्रात पठारी भागात पावसाने सातत्याने आपलं तांडव चालवलं असल्याने या भागातल्या उभ्या पिकांचं, फळबागांचं, शेतजमिनींचं, गाईगुरांचं आणि लोकांच्या निवाऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पावसाने गावंच्या गावं साफ केली आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारला मोठी मदत करावी लागणार आहे. सुदैवाने या संकटाची चाहूल आधीच लागली असल्याने सरकारची यंत्रणाही बऱ्यापैकी तयारीत आहे. मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेऊन मदतीची प्राथमिक घोषणा झाली, ती दिलासादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्तांना दिलेला दिलासाही खूपच आश्वासक ठरला आहे.

आपत्तीग्रस्त परिस्थितीचा पूर्ण आढावा घेऊन सर्व पंचनामे झाल्यानंतर एकत्रित मदत करण्याची पद्धत आतापर्यंत होती. यावेळी मात्र परिस्थितीनुसार जसजसे पंचनामे होत जातील, त्या त्या ठिकाणी त्यानुसार मदत पोहोचवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला, ही फार चांगली गोष्ट झाली. त्यामुळे, मदत लवकर पोहोचेल आणि पुनर्वसनालाही लवकर सुरुवात होईल. धोका एवढाच, की यामुळे पंचनाम्यांबाबतच्या तक्रारी दीर्घकाळ सुरू राहतील. त्या राहूच नयेत, यादृष्टीने स्थानिक प्रशासनाला सक्त सूचना देण्याची गरज आहे. या महाप्रलयातून ज्यांची सुटका करावी लागली, त्यांची संख्या

शेकड्यात असली, तरी विस्थापितांची संख्या काही लाखांत असणार आहे. घरांची पडझड, शेतजमिनींचं नुकसान, शाळांच्या, तलाठी कार्यालय ग्रामपंचायत इमारतींचं नुकसानही मोठं असणार आहे. एवढा सगळा भार राज्य सरकार एकट्याच्या बळावर उचलू शकेल, असं दिसत नाही. त्यासाठी केंद्र सरकारच्या सढळ मदतीची गरज जाणवणार आहे. देशात अनेक ठिकाणी हे अस्मानी संकट कोसळलं असल्याने केंद्र सरकारलाही त्याची जाणीव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्या आनुषंगाने केंद्रातील महत्त्वाच्या मंत्र्यांना, अधिकाऱ्यांच्या पथकाला पाहणी करण्यास सांगून मदत जाहीर करतीलच. या मदतीचा समन्वय ठेऊन त्यातून प्रभावी काम होणं आणि कमीत कमी वेळेत ग्रामीण जीवन पूर्वपदावर आणणं हेच पुढचं आव्हान आहे. स्वयंसेवी, नागरी संस्थांनीही त्यासाठी लगेच पुढाकार घ्यायला हवा.

**शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल कोल्हापूर.**

## पान १ वरुन

### जिल्ह्यात येलो ...

असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### जालना जिल्ह्यातील ...

पाठीशी असून, कोणीही काळजी करू नये. बाधित नागरिकांना शासन शक्य ती मदत करणार आहे. परतूर तालुक्यातील गोळेगावचा अनेक वर्षाचा पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. हा प्रश्न मी पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडून, पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. तसेच या पुरामुळे अनेक नागरिक बेघर झाले असून, त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्यांना मदत देण्यात येणार आहे. ज्या भागात ६५ मिमी पेक्षा जास्त पाऊस झाल्यास त्या भागात अतिवृष्टी घोषित करण्याचा नियम आहे. परंतु जिल्ह्यात ज्याठिकाणी ६५ मिमी पेक्षा देखील कमी पाऊस झाला असेल पण त्या ठिकाणी जास्त नुकसान झाले असल्यास त्याचेही पंचनामे करण्याच्या तसेच जिल्ह्यातील पर्जन्यमापकाची तपासणी करण्याच्या सूचना श्रीमती पंकजा मुंडे यांनी प्रशासनाला यावेळी दिल्या.

यावेळी परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर, घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम. मिनु, परतूरचे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसिलदार प्रतिभा गोरे, घनसावंगीचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार पूजा वंजारी, तहसीलदार विजय चव्हाण, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह नांदूर हवेली येथील गावकऱ्यांची उपस्थिती होती.

### एकही शेतकरी ...

महसूल, कृषि, पशुसंवर्धन, कृषि विद्यापीठ यांच्यासह संबंधित यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

कृषिमंत्री श्री.भरणे संवाद साधताना म्हणाले, अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवाने कष्टाने पिकविलेल्या शेती पिकाचे नुकसान झाले आहे. जालना जिल्ह्यात नुकसानीचे क्षेत्र अधिक आहे. कपाशी, सोयाबीन यासह इतर पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात आहे. पशुधन तसेच घराची पडझड झाली आहे. जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांसह तातडीने पंचनामे करून राज्य शासनाकडे अहवाल सादर करावा. अहवाल प्राप्त होताच तातडीने नुकसान भरपाई देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, काळजी करू नका, शासन आपल्या सोबत आहे, असा धीर त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

जालना जिल्ह्यात ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात क्षेत्र बाधित झाले आहे. गेल्या आठ-दहा दिवसात मोठ्या प्रमाणात शेती पिकाचे नुकसान झाले आहे. शेतीशिवारात पिके पाण्याखाली आहेत, तर कुठे पीक वाहून गेल्याचे दिसत आहे. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत तातडीने मदत पोहचलीच पाहिजे म्हणून जिल्हा प्रशासनाने तत्परतेने पंचनामे करून अहवाल सादर करावा, असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले.

राज्याच्या कृषिमंत्री म्हणून आपण सर्व शेतकरी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. तसेच शासनाची भूमिका शेतकऱ्याला आधार देण्याचीच असून नुकसानीचे पंचनामे होऊन प्रस्ताव सादर होताच मदत तत्परतेने मदत मिळेल, संकटाच्या काळात आपण सर्व शेतकरी बांधवांच्या पाठीशी उभे राहूयात असेही ते म्हणाले. यावेळी शासनाच्या विविध विभागांचे प्रमुख, लोकप्रतिनिधी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घाणेवाडी जलाशयातून ...

प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असल्याची तक्रार प्राप्त होताच प्रशासन तत्पर झाले. स्थळ पाहणी करून पंचनामा करण्यात आला.

अवैध वाळू उपसा हा केवळ पर्यावरणीय हानीकारक नाही तर शासनाच्या महसुलालाही तडा देणारा आहे. जलाशयातून होणाऱ्या बेकायदेशीर उपशामुळे पाण्याचा साठा धोक्यात येतो आणि जलसंपत्तीवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने अशा प्रकारच्या कारवायांवर कडक पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार, या प्रकरणी जबाबदार व्यक्तींवर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला जाईल. तसेच भविष्यात अशा प्रकारची अवैध वाळू उपसा टाळण्यासाठी अधिक गस्त, पाळत आणि कठोर उपाययोजना केली जाणार आहेत.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसगट हेक्टरी ५० हजार रुपये द्या - ॲड रामकृष्ण बनकर

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यासह अकोला देव परिसरात गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या पावसाने व गेल्या दोन दिवसापूर्वी झालेल्या अतिवृष्टीने शेतशीवारात पाणीच पाणी झाल्याने खरीप हंगामातील पिकांचे पूर्णपणे नुकसान झाले असून जाफराबाद तालुक्यासह अकोला देव परिसरात पिकांचे सरसगट पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये द्यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुक्याचे नेते ऍड रामकृष्ण बनकर यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे

या पत्रकात श्री बनकर यांनी म्हटले आहे की,यावर्षी लागवडीपासून पावसाचे प्रमाण अधिक असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते ,गतवर्षीपेक्षा लागवड ही मोठ्या प्रमाणावर होती, पिके बहरून जोमात असतांना सप्टेंबर व ऑगस्ट महिन्यात पावसाने वेळोवेळी हजेरी लावून गेल्या दोन दिवसांपूर्वी जाफराबाद तालुक्यासह, देळेगव्हाण, अकोला देव, पोखरी, डोणगाव, निवडुंग, गाडेगव्हाण, आंबेगाव, निमखेडा, सातेफळ, बूटखेडा आदी गावात गेल्या दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने दाणादाण करून ऐन जोमात असलेले पीक जमीनदोस्त होऊन या अति पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले असल्याचे पाहायला मिळत आहे



विशेषतः या अकोला देव परिसरात शेडनेटचे प्रमाण अधिक असून अनेक शेतकरी वेगवेगळ्या प्रकारचे पिकांचे उत्पादन यातून घेत असतात परंतु गेल्या दोन दिवसांपूर्वी झालेल्या या अतिवृष्टीने शेडनेट व त्यातील पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. परिसरातील ओढे नाले शंभर टक्के भरलेले पाहायला मिळत आहे. अकोला देव परिसरातील शेतकऱ्यांचा खरीप हंगाम जवळपास वाया गेला असुन शेतकऱ्यांनी केलेला खर्च निघणेही अपेक्षित नाही यातून शेतकरी अधिक कर्जबाजारी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशीच परिस्थिती राहिली तर रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांकडे पर्याय राहणार नसल्याने शासनाने तात्काळ अकोला परिसरातील, देळेगव्हाण, गाडेगव्हाण, आंबेगाव, डोणगाव, पोखरी, बूटखेडा, सातेफळ, निमखेडा, निवडुंग, तोंडोळी, आदी गावासह तालुक्यात सरसगट पंचनामे करून शेतकऱ्यांची दिवाळी गोड करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते ऍड रामकृष्ण पाटील यांनी या पत्रकात शेवटी केली आहे.

# जेइएस महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा



**जालना । प्रतिनिधी -** जेईएस महाविद्यालय जालना,येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयात रॅली काढून राष्ट्रीय सेवा योजना जिंदाबादच्या घोषणा देण्यात आल्यात. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील परिसर स्वच्छ केला. गाजर गवत उपटून तसेच परिसरातील पाला पाचोळा उचलून झाडूने परिसर स्वच्छ केला.

यावेळी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी मार्गदर्शन केले, विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये स्वच्छता अमलात आणावी. स्वतःची व परिसराची स्वच्छता करावी .स्वच्छतेमुळे मानवी जीवन निरोगी असते असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी केले ,राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना स्वावलंबी जीवन कसे जगावे, हे शिकवते, नॉट मी बट यु, माझ्यासाठी नव्हे, माझे जीवन समाजासाठी आहे, ही राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना विद्यार्थ्यांना डॉ. सोनवणे यांनी समजून सांगितली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व सांगून श्रम संस्कार जीवनात महत्त्वाचे असल्याचे सांगितले. माजी कार्यक्रम अधिकारी डॉ.गणेश रोकडे यांनीही विद्यार्थ्यांना श्रम दानाचे महत्त्व पटवून सांगितले.

यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने श्रमदानासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश लहामाटे यांनी तर उपस्थित आमचे आभार प्रा. किशोर तापडिया यांनी व्यक्त केलेत.

या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, उपप्राचार्य डॉ. सदावर्ते,पर्यवेक्षक डॉ. बिक्कड, तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सनातन संस्थेवर बंदी घालण्याची याचिका मुंबई उच्च न्यायालयातून निकाली

# सनातन संस्थेचे निर्दोषत्व पुन्हा सिद्ध; ‘हिंदु दहशतवादा’च्या षड्यंत्राचा पर्दाफाश

**मुंबई -** सनातन संस्थेला ‘दहशतवादी संघटना’ ठरवून तिच्यावर बंदी घालण्यासाठी वर्ष २०११ मध्ये दाखल करण्यात आलेली जनहित याचिका अखेर मागे घेण्याची नामुष्की याचिकाकर्त्यांवर ओढवली. तब्बल १४ वर्षे चाललेल्या या न्यायालयीन संघर्षात, याचिकाकर्त्यांना संस्थेच्या विरोधात दहशतवादाचा एकही पुरावा सादर करता आला नाही. ‘‘याचिकेची सुनावणी घेण्यासाठी कोणताही आधार नाही. तुम्ही याचिका मागे घेता कि आम्ही ती फेटाळून लावू?’’, अशा कठोर शब्दांत माननीय मुंबई उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर याचिकाकर्त्यांना आपली याचिका बिनशर्त मागे घेतली. हा केवळ सनातन संस्थेचा विजय नसून, सत्य, न्याय आणि धर्मनिष्ठा यांचा विजय आहे. आमची न्यायदेवतेवर श्रद्धा होती, ती आज पुन्हा एकदा सत्यात उतरली. सर्वशक्तीमान भगवंत, न्यायदेवता, आमचे गुरु आणि या प्रकरणात आमच्या बाजूने लढणारे अधिवक्ते यांच्याबद्दल कृतज्ञ आहोत, असे सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी या निकालानंतर म्हटले आहे.

सनातन संस्थेच्या वतीने हिंदु विधीज्ञ परिषदेचे अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर, सचिव अधिवक्ता संजीव पुनाळेकर, तसेच ज्येष्ठ अधिवक्ता सुभाष झा, अधिवक्ता अलौकीक पै आणि अधिवक्ता वसंत बनसोडे यांनी बाजू मांडली. गेल्या दीड दशकापासून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि डाव्या विचारसरणीच्या ‘इकोसिस्टम’ने सनातन संस्थेला लक्ष्य करून ‘भगवा आतंकवादा’चा खोटा नॅरेटिव्ह रचला. वर्ष २००८ ते २०२५ या काळात सनातन संस्थेची झालेली अपरिमित हानी आणि हजारो निष्पाप साधकांना सोसावा लागलेला प्रचंड मानसिक त्रास याची भरपाई कोण करणार? या संपूर्ण काळात सनातन संस्थेने भारतीय न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास ठेवून पूर्ण संयमाने सर्व तपास यंत्रणांना सहकार्य केले. देशातील सर्वात मोठी राष्ट्रवादी संघटना असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर ज्याप्रमाणे खोटे आरोप करून बंदी घालण्यात आली, त्याच इतिहासाची पुनरावृत्ती करण्याचा हा प्रयत्न होता, जो न्यायदेवतेने हाणून पाडला आहे, असेही वर्तक म्हणाले.

सनातन संस्थेला आतंकवादी ठरवून तिच्यावर बंदी घालावी, अशी मागणी सर्वप्रथम वर्ष २००८ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने केली, त्यानंतर काँग्रेसने ‘हिंदु दहशतवाद’ हा शब्द प्रचलित करण्यासाठी आटापिटा केला; मात्र प्रत्येक वेळी सनातन संस्था निर्दोष सिद्ध झाली. वर्ष २००८ च्या गडकरी रंगायतन स्फोट प्रकरणात सनातनला सर्वप्रथम गोवले; परंतु न्यायालयात सनातन संस्था निर्दोष ठरली. पुढे वर्ष २००९ मध्ये गोव्यात मडगाव बॉम्बस्फोट प्रकरणातही काँग्रेस सरकारने सनातनला गोवले; या प्रकरणीही विशेष सत्र न्यायालयाने २०१३ मध्ये सनातनचे निर्दोषत्व सिद्ध करत तपासयंत्रणांवर ताशेरेही ओढले. वर्ष २०१३ मध्ये डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणातही सनातनला लक्ष्य करून अडकवण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तोही पुढे निष्फळ ठरला. हे सर्व खटले म्हणजे ‘हिंदु दहशतवाद’ सिद्ध करून सनातन संस्थेला संपवण्याच्या मोठ्या कटाचा भाग होता.

ईश्वराचे कार्य करणाऱ्या संघटनेला संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना काळाने (ईश्वराने) योग्य उत्तर दिले आहे. या कठीण काळातही सनातन संस्थेचे राष्ट्र, धर्म आणि समाजहिताचे कार्य अविरतपणे वाढतच असून नुकतेच सनातनने रौप्य महोत्सवी वर्ष साजरे केले. न्यायालयाने सनातनला निर्दोष मुक्त केले आहे; मात्र सनातन धर्मविरोधी प्रवृत्तींच्या विरोधातील अर्थात् या ‘इकोसिस्टम’च्या विरोधातील लढा अद्याप संपला नाही. हा लढा लढण्यासाठी सर्व हिंदूंनी संघटित होण्याची गरज आहे, असेही श्री. अभय वर्तक म्हणाले.

## औद्योगिक वसाहत परिसरात ट्रान्सफार्मरला आग; वीज पुरवठा खंडित

**जालना -** जालना शहरातील औद्योगिक वसाहत परिसरात महाराष्ट्र राज्य विद्यूत पारेषण कंपनीच्या दोन ट्रान्सफार्मर युनिटला आज सकाळी भीषण आग लागली. अग्निशमन दलाच्या तत्पर प्रयत्नांनी आग आटोक्यात आणली असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या आगीनिमित्त जुना जालना आणि चंदनझीरा परिसरात ५ ते ६ तास वीज पुरवठा खंडित राहणार आहे. अग्निशमन दलाचे अधिकारी माधव पानपट्टे, सहा अधिकाऱ्यांसह सात ते आठ जवान घटनास्थळी काम करत होते, तसेच स्थानिक कंपन्यांकडून पाण्याचे टँकर उपलब्ध करून दिले गेले. औद्योगिक वसाहतीतील ही घटना तात्काळ नियंत्रणात आली, त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

# टेंभुर्णी त्रिकुटा माता भक्तांचे उत्हावर्धक स्वागत

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** तालुक्यातील टेंभुर्णी येथील त्रिकुटा माता मंदिर परिसरात नवरात्रच्या दिवशी भक्तांचे विशेष स्वागत करण्यात आले आहे या स्वागतासाठी सरकार संघाच्या वतीने संजय राऊत उपस्थित होते त्रिकुटा माता भक्त कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिरातून १७ सप्टेंबर रोजी प्रज्वलित मशाल ज्योत घेऊन पायी मशाल रॅली असून भक्तांनी येणारा पाऊन वारा याची तमा न करता दररोज १२५ ते १५० किलोमीटर प्रवास करत पाच दिवसांत गावात पोहचवली टेंभुर्णी येथील त्रिकुटा माता मंदिरात नवरात्र नऊ दिवस मोठा उत्सव साजरा केला जातो या रॅलीमध्ये चार दररोज शेकडो महिला -पुरूष सहभागी होतात आणि पहिलीचा समारोप मंदिर परिसरात केल्या जातो दरवर्षीही ज्योतिका शक्तीपीठातून आणली जाते यासाठी फक्त भक्त परिवारातील काही सदस्य आठवड्यापूर्वी जो काढण्यासाठी प्रस्थान करतात वर्षी ज्योत आणणाऱ्या भक्तामध्ये विलास कुमकर संतोष शिंदे तुळशीराम पोटे मनोज गोपाल कुदळे समाधान सावंत गोरख शिंदे पवन जोशी ज्ञानेश्वर घाटे बालाजी शिंदे निलेश दहीकर शैलेश देशमुख शुभम धनवई दीपक सातभाई सुनील सोनसाळे संतोष माने संभाजी चव्हाण गजानन डोईफोडे बालाजी डोमळे शुभम माने शुभम इंगळे शुभम घोडके गोपाल काठोळे यांचा सामावेश आहे भक्तांनी सांगितले आहे की देवीच्या कृपेने हा प्रवास आनंदमय होतो आणी गावात उत्साहात स्वागत झाल्यानंतर सर्व थकवा दूर होतो.





**जालना कृषी उत्पन्न बाजार समिती च्या सचिव पदी भरत तनपुरे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष अनिल व्यवहारे, उद्योजक संजय सिंगारे, रामेश्वर गडगिळे, प्रसाद काकडे व हार्दिक फलके छायाचित्र दिसत आहे.**

# शेतकरी मदतीपासून वंचित

## अनुदान वर्ग करण्याची निवेदन देऊन केली मागणी



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** मागील वर्षी फेब्रुवारी महिन्यात जाफ्राबाद तालुक्यात झालेल्या गारपीटचे पंचनामे व केवायसी होऊन वर्ष उलटले तरी अद्याप शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही.याबाबत त्रस्त शेतकऱ्यांनी सोमवारी निवासी जिल्हाधिकारी गणेश महाडिक यांना निवेदन देऊन तात्काळ अनुदान वर्ग करण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात शेतकऱ्यांनी म्हटले आहे की २६ फेब्रुवारी २०२४ रोजी जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी व परिसरात मोठ्या प्रमाणावर गारपीट व अतिवृष्टी झाली होती त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी गारपीटग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करण्याचे आदेश दिले होते त्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून अहवाल वरिष्ठ कार्यालयाला गेला त्यानुसार शासकीय मदतीची यादीही प्रशासनाकडे उपलब्ध झाली संबंधित शेतकऱ्यांनी केवायसी अपडेटही पूर्ण केले परंतु ही मदत खात्यात वर्ग झाली नसल्याने शेतकऱ्यांनी वेळोवेळी तहसीलदार जाफराबाद यांना या संदर्भात माहिती मागितली परंतु अपेक्षित उत्तर व अनुदान प्राप्त झाले नसल्याने सोमवारी त्रस्त शेतकऱ्यांनी मदत मिळण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर खालील शेतकरी यांची सही आहे त्यात संजय राऊत, श्रीराम आवटी,रघुराम उखर्डे कृष्णा धनवई, पांडुरंग बोरसे,गंगाबाई देशमुख, शालिग्राम धनवई रायभान महानोर कृष्णा धनवई लक्ष्मी महानोर बालाजी भागवत, सखाराम उखर्डे , ठकसेन उखर्डे, दगडूबा उखर्डे,आसिफ सिद्दीकी संजय कळंके,बालाजी कुमकर,चंद्रकांत देशमुख यांनी निवेदन दिले.

> अनुदाना संदर्भात आपण वेळोवेळी तहसील कार्यालयात आवश्यक ती बाब पूर्ण केली आहे परंतु वारंवार तहसील कार्यालयाकडून गारपीट अनुदाना संदर्भात व्यवस्थित माहिती पुरविली जात नाही यामुळे जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी लक्ष देऊन वर्षभरापासून रखडलेले आमचे अनुदान खात्यात वर्ग करावे.
>
> **ठकसेन उखर्डे, त्रस्त शेतकरी टेंभुर्णी**

# टेंभुर्णी स्थानिक पत्रकार संघाच्या अध्यक्ष पदी शेख साबेर तर सचिव पदी प्रल्हाद जाधव यांची निवड

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** नुकताच्या झालेल्या बैठक मध्ये टेंभुर्णी येथील स्थानिक पत्रकार संघाची कार्यकारणी सर्वानुमते नक्की करण्यात आली. या वेळी येथील जेष्ठ पत्रकार पी जी तांबेकर यांच्या अध्यक्षते खाली व निवडणूक निर्वाचन अधिकारी म्हणून गणेश भिसे यांच्या मार्गदर्शन खाली सगळी नवीन कार्यकारणी नक्की कार्यकारणी करण्यात आली.या वेळी येथील तरुण पत्रकार शेख साबेर यांची अध्यक्ष म्हणून तर सुनील जोशी यांची उपाध्यक्ष व दैनिक सामानाचे प्रतिनिधी प्रल्हाद जाधव यांची सचिव म्हणुन निवड करून राहिलेली कार्यकारणी घोषित केली.

या वेळी जेष्ठ पत्रकार रावसाहेब अंभोरे,अलकेश सोमाणी,संजय राऊत दत्ता देशमुख शेख नसीम, पी जी तांबेकर यांनी आपली मनोगत समोर ठेवली.जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी ही मोठी बाजार पेठ आहे तालुक्यातील राजकीय इतर घडामोडी येथे नित्य नियम घडत राहतात या मुळे येथील पत्रकार संघाची भूमिका खूप महत्वाची असते. या मुळे सर्वांनी या वेळी सामाजिक राजकीय व आर्थिक बाबीवर या सर्व येणाऱ्या बातम्या मुळे नक्कीच फरक पडतो या मुळे येणाऱ्या काळात सर्वांनी एक नियम दिले असून दिलेली आचार सहिता योग्य प्रकारे करण्याची या वेळी सर्व पत्रकार संघाने नक्की केले. यावेळी जेष्ठ पत्रकार पि जी तांबेकर, अलकेश सोमाणी, गणेश भिसे, रावसाहेब अंभोरे, विनोद कळंबे, नसिम शेख, संजय राऊत, दत्ता देशमुख, सुनिल भाले, फकरू कुरेशी, बालाजी शेवाळे, शेख अश्पाक विष्णु मगर, अशोक पाबळे, गणेश भिसे, गजानन शेळके, यादी पत्रकार उपस्थित होते.



# जालना तालुक्यात अतिवृष्टीने मोठे नुकसान: तात्काळ पंचनामे करावे - दानवे

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संकटात आले आहेत. या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून रस्ते, पूल आणि शेतीसाठी महत्त्वाचे मार्ग वाहून गेले आहेत. तसेच काही भागात मुक्या जनावरांचीही जीवित हानी झाली आहे. भाजपा जालना महानगराचे जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्राद्वारे तात्काळ मदत देण्याची मागणी केली आहे. पत्रामध्ये त्यांनी सांगितले आहे की, तालुक्यातील प्रत्येक मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या स्तरावर तात्काळ पंचनामे करावे. तसेच, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासन स्तरावर योग्य ती मदत मिळावी व त्यांना दिलासा दिला जावा. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान जास्त वेळ न गवसता लवकरात लवकर भरून काढले पाहिजे. शासन आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित पंचनामे करावेत, या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे. यावेळी तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, विष्णू बापू डोंगरे, विजय मोहिते, गोवर्धन कोल्हे, नागेश अंभोरे, राजाराम जाधव, माऊली उगले, विलास मोहिते, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने जप्त

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पथकाने केली कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात होणाऱ्या विनापरवाना अवैध वाळू वाहतूकीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नियंत्रण आणण्यासाठी महसूल विभागाचे विशेष पथक तयार केले असून या पथकामार्फत जिल्ह्यात विनापरवाना वाळू वाहतूक करणाऱ्यावर धडक कारवाई करण्यात येत आहे.

भोकरदन तालूक्यात जालना-राजूर रोडवर जिल्हाधिकारी आाशिमा मित्तल यांच्या पथकाने भोकरदन तालूक्यातील राजुर गणपती येथील अनिल रमेश जाधव यांच्या मालकीच्या हायवा मध्ये हायवा वाहन चालक आनंद रावसाहेब खिल्लारे अवैधरित्या वाळू वाहतुक करतांना निदर्शनास आला. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी वाळू वाहतूक परवानाबाबत चौकशी केली असता, संबंधीताकडे कोणताही परवाना नसल्याने जिल्हाधिकारी यांनी सुमारे दोन ब्रास वाळूसह हायवा जप्त केला. तसेच दूसऱ्या कारवाईत जालना-राजूर रोडवरच जिल्हाधिकारी आाशिमा मित्तल यांच्या पथकाने भोकरदन तालूक्यातील देऊळगाव येथील दिनकर बाजीराव जुंबड यांच्या मालकीच्या हायवा मध्ये हायवा वाहन चालक गणेश सुदाम नाबदे अवैधरित्या सुमारे ५ ब्रास वाळू वाहतुक करतांना निदर्शनास आला. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी वाहनचालकास वाळू वाहतूक परवानाबाबत चौकशी केली असता, संबंधीताकडे कोणताही परवाना नसल्याने जिल्हाधिकारी यांनी सुमारे ५ ब्रास वाळूसह हायवा जप्त केला.

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी-राजुर रोडवर विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर महसुल पथकाने जप्त करून टेंभुर्णी येथील पोलीस ठाण्यात जमा करण्यात आल्याची माहिती जाफ्राबाद तहसिलदार सारिका भगत यांनी दिली आहे. यामध्ये पहिल्या प्रकरणात जाफ्राबाद तालूक्यातील खापरखेडा येथील विष्णु गणेश म्हस्के यांच्या मालकीच्या जॉन डियर कंपनी ट्रॅक्टरमध्ये विनापरवाना अवैध वाळुने भरलेला तसेच वाहन क्रमांक नसलेला ट्रॅक्टर अवैध वाळू वाहतुक करताना वाहन चालक संदिप काशिनाथ इंगळे यांच्यासह महसूल विभागाच्या पथकाने धडक कारवाई करुन जप्त केला. तसेच दूसऱ्या कारवाईत संदीप बाबुराव गोफणे यांच्या मालकीच्या सोनालिका कपंनीच्या ट्रॅक्टरमध्ये विनापरवाना अवैध वाळुने भरलेला तसेच वाहन क्रमांक नसलेला ट्रॅक्टर अवैध वाळू वाहतुक करताना वाहन चालक संदीप लिंबाजी रोकडे यांच्यासह महसूल विभागाच्या पथकाने



कारवाई करुन जप्त केला. या महसुल पथकात नायब तहसीलदार चव्हाण, ग्राम महसूल अधिकारी बी. जी. ब्राम्हणे, अमोल मुरकुटे, एन. एच. पठाण, माधव साळवे, राजू खांडेभराड यांचा समावेश होता.

जिल्ह्यात अवैध वाळू उपसा किंवा अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

# जालना जिल्ह्यात गुटखा माफियांवर अंकुशाची गरज

## जिल्हाधिकाऱ्यांकडून ठोस पावले अपेक्षित

**दीपक शेळके**

**जालना -** जिल्ह्यात अलीकडेच जिल्हाधिकाऱ्यांनी अवैध वाळू उपशावर कडक कारवाई करण्यासाठी महसुल विभागाचे विशेष पथक नेमले. एका दिवसात दोन ठिकाणी छापे टाकून लाखो रुपयांचा वाळू उपसा रोखण्यात यश मिळाले. या हालचालींमुळे शासनाच्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी कशी करता येते, याचे उदाहरण जिल्ह्यात निर्माण झाले आहे. याच धर्तीवर आता गुटखा विक्री व वितरणावर अंकुश आणण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्र शासनाने गुटख्यावर बंदी घातली असली तरी जालना जिल्ह्यात गुटखा सहज उपलब्ध होत आहे. बंदी असूनही गुटखा विक्रेत्यांचे जाळे गावोगावी पसरलेले आहे. यामागे केवळ काळ्या बाजारपेठेतील फायद्याची लालसा नसून काही अंशी पोलीस व प्रशासनातील शिथिलतेचाही मोठा वाटा आहे.

गुटखा विक्रीस अडथळा न आणता, काही ठिकाणी ती सर्रास सुरु राहते. यामध्ये स्थानिक स्तरावरील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांचा अप्रत्यक्ष पाठिंबा असल्याचे आरोप अनेकदा झालेले आहेत. अशा संरक्षणामुळे गुटखा माफियांचे मनोबल वाढत असून, शासनाचा निर्णय केवळ कागदोपत्री राहत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी महसुलप्रमाणेच अन्न व औषधी प्रशासन तसेच पोलीस विभागासोबत विशेष पथक नेमण्याची गरज आहे. वाळू उपशाच्या कारवायांप्रमाणे गुटखा माफियांवर

### जिल्हाधिकाऱ्यांकडून जनतेची अपेक्षा

विक्रीस साहाय्य करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी व कारवाई.
जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये विशेष पथकांच्या धाडसी मोहीमा. गुटख्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती मोहिमा.
जप्त गुटख्याची तात्काळ नासधूस करून पारदर्शक अहवाल प्रसिध्द करणे.

धडक कारवाई केल्यासच समाजात योग्य संदेश जाईल. गुटखा सेवनामुळे हजारो युवकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. तोंडाचा कर्करोग, हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढत आहे. याकडे केवळ कायद्याच्या दृष्टिकोनातून नव्हे तर सामाजिक व आरोग्य विषयक संकट म्हणूनही पाहणे गरजेचे आहे.

जालना जिल्ह्यात गुटखा विक्रीचे साम्राज्य उभे राहत आहे. शासनाची बंदी फक्त नावापुरती ठरत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी ठोस निर्णय घेऊन गुटखा माफियांच्या मुसक्या आवळल्या तरच शासनाचा निर्णय समाजहितासाठी परिणामकारक ठरेल. अन्यथा गुटखा विक्रीमागील राजकीय, आर्थिक व प्रशासकीय संगनमत कायम राहील आणि त्याचा फटका सामान्य जनतेच्या आरोग्यास बसत राहील. याच कारणास्तव जालना जिल्हाधिकारी यांनी आता गुटखा बंदीची कडक अंमलबजावणी करण्यासाठी तातडीने पुढाकार घ्यावा, अशीच जनतेची अपेक्षा आहे.

## जालना स्टील उद्योगांना ग्रीन स्टार मानांकन

# जालन्याचा अभिमान कालिका स्टील्सला मिळाले ५ स्टार मानांकन

**जालना । प्रतिनिधी -** पॅरिस करार २०१५ अंतर्गत भारतासह सर्व देशांनी कार्बन फूटप्रिंट कमी करण्याचे वचन दिल्यानंतर भारत सरकारच्या स्टील मंत्रालयाने २०२४ मध्ये ग्रीन स्टील टॅक्सोनॉमी जाहीर केली होती. या टॅक्सोनॉमीनुसार स्टील उत्पादक उद्योगांना त्यांच्या उत्पादन प्रक्रियेत होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाच्या प्रमाणानुसार ३ स्टार, ४ स्टार व ५ स्टार अशा श्रेणीत वर्गीकृत करण्याची पद्धत सुरू करण्यात आली.




**कालिका स्टील्सला मिळाले ५ स्टार मानांकन**

जालना येथील कालिका स्टील्स या नामांकित उद्योगसंस्थेने या मानांकनासाठी अर्ज केला होता. कठोर तपासणीनंतर आणि निकषांची पूर्तता केल्यानंतर कालिका स्टील्सला ५ स्टार प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.

हा सन्मान नुकत्याच झालेल्या AIIFA (All India Induction Furnaces Association) च्या वार्षिक कार्यक्रमात देण्यात आला.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा उद्योग विभागप्रमुख देवेंद्र फडणवीस, केंद्रिय खाण व कोळसा मंत्री प्रह्लाद जोशी, तसेच महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते कालिका स्टील्सला हा गौरव प्रदान करण्यात आला.

५ स्टार मानांकन मिळणे म्हणजे स्टील उद्योगातील कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे प्रतिक आहे. ग्रीन स्टील संकल्पनेमुळे उद्योग जगतात टिकावू विकास (sustainable development) साध्य करण्याचा मार्ग मोकळा होतो. कालिका स्टील्ससारखे उद्योग पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब करून इतरांसाठी आदर्श निर्माण करत आहेत.

या यशामुळे जालना शहराला एक नवा दर्जा मिळाला आहे. देशातील प्रमुख औद्योगिक केंद्र म्हणून जालना आधीच स्टील उद्योगांसाठी प्रसिद्ध आहे. मात्र, ग्रीन स्टार मानांकनामुळे जालना आता पर्यावरणपूरक स्टील सिटी म्हणूनही ओळख मिळवणार आहे.

स्टील मंत्रालयाने यापुढे सर्व उद्योगांना अशा मानांकनासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे. कमी कार्बन उत्सर्जन, नवीकरणीय ऊर्जा वापर, कचरा व्यवस्थापन व पर्यावरणपूरक उत्पादन पद्धती या निकषांवर पुढील काळात अधिक स्पर्धा वाढणार आहे.

## टाटा मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंपनीत सिद्धार्थ महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांची निवड




**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** येथील सिल्लोड शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचालित सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष या विभागा तर्फे बजाज ऑटो लिमिटेड वाळूज, छ. संभाजीनगर व टाटा मोटर्स प्रा. लि. पुणे या कंपनीने कॅम्पस भरती आयोजित केलेली होती. या कॅम्पस भरतीमध्ये टाटा कंपनीकडून बारावी उत्तीर्ण झालेल्या पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. तसेच बजाज ऑटो लिमिटेड वाळूज छ. संभाजीनगर या कंपनीने दोन विद्यार्थ्यांची निवड केली या निवडीबद्दल सिल्लोड शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. दादासाहेब म्हस्के, सचिव प्रा. डॉ. राहुलभाऊ म्हस्के, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर टी देशमुख उपप्राचार्य डॉ. एस एल मेढे उपप्राचार्य डॉ. एस के सर्जे कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विनोद हिवराळे, या विभागाचे समन्वयक प्रोफेसर डॉ. विजय पाटील डॉ.एस एस ठोंबरे, डॉ. एस डी एरंडे, डॉ प्रदीप मिसाळ, डॉ. डी टी तांगडे, डॉ.बी के आहेर प्रा. यु एम वझरकर व विद्यार्थी तसेच महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. अनिल वैद्य व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# अर्जुननगरातील रिकाम्या प्लॉटवरील पाणी; महापालिकेची खंडणीखोरी की जनसेवा?

**जालना । प्रतिनिधी -** अर्जुननगर येथील जॉन्सन पाखरे यांच्या मालकीच्या रिकाम्या प्लॉटवर पावसामुळे पाणी साचले. या पाण्याचा निचरा करण्याऐवजी महापालिका प्रशासनाने नागरिकालाच १ लाख १५ हजार रुपयांचा खर्च दाखवून त्याची भरपाई करण्यासाठी नोटीस पाठवली. या तुघलकी निर्णयामुळे शहरात संतापाची लाट उसळली असून, आयुक्तांच्या कारभारावर तीव्र टीका होत आहे. पावसामुळे जॉन्सन पाखरे यांच्या मातीच्या घरात पाणी शिरले व घर कोसळले. गोठ्यातील म्हशी पाण्यात उभ्या राहिल्याने जनावरांचेही



हाल झाले. अशा परिस्थितीत मदत करण्याऐवजी महापालिकेने ६५,००० आणि ५०,००० रुपये अशा दोन नोटीसा पाठवल्या. महापालिकेने या पाण्याच्या उपशासाठी १.१५ लाखांचा खर्च दाखवून त्याची वसुली पाखरे यांच्याकडून करण्याचा आदेश दिला. जॉन्सन पाखरे यांनी संतप्त होत सांगितले की, माझे घर पावसाने उद्ध्वस्त झाले, संसार उघड्यावर आला. अशा वेळी मदत करायला हवी होती, पण महापालिका मात्र नोटीसा पाठवून खंडणी वसूल करत आहे. नोटीस मागे घेतली नाही तर महापालिका आयुक्तांसमोर आत्मदहन करीन, असा इशारा त्यांनी दिला. शहरातील नागरिकांनी महापालिकेच्या या कारभाराची निजामी वसुली अशी तुलना केली. सेवा देण्याऐवजी सामान्यांना त्रास देणारे आदेश काढले जात आहेत, अशी टीका होत आहे. महापालिका नागरिकांची सेवा करते की खंडणी वसूल करते? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. पालिकेचे काम म्हणजे शहरातील अडचणी सोडवणे, पाणी काढणे, स्वच्छता राखणे. मात्र, आता नागरिकांनाच खर्चाची जबाबदारी लादण्याची पद्धत सुरू झाली तर गरीबांचे जगणे आणखी कठीण होणार आहे. या घटनेतून प्रशासनाच्या जबाबदारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, महापालिकेने तातडीने नोटीसा मागे घेऊन पाखरे यांना मदत करावी, अशी सर्वसामान्यांची मागणी होत आहे.

### आपलं ठेवा झाकून अन् जनतेचे पहा वाकून

महानगर पालिका झाल्यानंतर नागरिकांकडून वसुलीचा सपाटा लावला जात आहे. नुकतेच मनपा प्रशासनाने अनाधिकृत नळ कनेक्शनसाठी तिऱ्हाईत मार्फत नोटीसा पाठवून दहा हजारांची वसुलीच्या माध्यमातून कोटींचा कर वसुल केला. त्यानंतर आता अतिवृष्टीने नुकसान झालेल्या सामान्य नागरिकांकडून भरपाई पोटी नोटीसा पाठविल्या आहेत. केवळ पाखरे यांनाच मनपा ने नोटीस पाठविली की, अन्य इतरांनाही नोटीसा पाठविण्यात आला याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी, जर मनपा अशाच पद्धतीने कारभार करणार असेल. तर मनपा ऐवजी जालना ही नगर पालिका बरी होती असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आता आली आहे. मनपाने सुविधा पुरविण्यावर भर देणे गरजेचे आहे. नगर रचनाकार, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या हलगर्जीपणामुळे जालनेकरांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. ती भरपाई खरे तर जालना शहर महानगर पालिकेने देणे आवश्यक आहे. मनपाच्या आयुक्तांपासुन जबाबदार विभाग प्रमुख व स्वच्छता निरीक्षकांच्या संपत्ती जप्त करुन जालनेकरांच्या नुकसानीची भरपाई करण्यात यावी अशी मागणी आता जनतेतून होत आहे. मनपाचं आता असं झालयं आपलं ठेवा झाकून अन् जनतेचे पहा वाकून.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.